# समर्थन

# खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

## (सर्वसाधारण चर्चा)

## फेब्रुवारी - २०२६

## (महाराष्ट्र राज्य)

## सन २०२५-२६

## Supplementary demands

## ₹ 11,995.33 Crore














**समर्थन**

१०५, लोटस हाऊस, लिबर्टी सिनेमाच्या बाजूला, बॉम्बे हॉस्पिटल जवळ, विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, मरिन लाईन्स (पू), मुंबई - ४०० ०२०
दूरध्वनी क्र. : ०२२-२२००३०६०

विश्लेषक: रुपेश भालचंद्र कीर: ९८९२९३९६१७, सहाय्य : स्नेहा घरत व निर्मिती सहाय्य: प्रज्योत प्रकाश महादये

✉ : samarthanmumbai97@gmail.com / /www.samarthanadvocacy.org

# अर्थसंकल्पीय अधिवेशन- फेब्रुवारी, २०२६

## (खर्चाचे पूरक विवरणपत्र - सर्वसाधारण चर्चा)

- सन २०२५-२६ या वर्षाचा मूळ अर्थसंकल्प **रु. ७ लाख ५७ हजार ५७५ कोटी रुपयांचा** होता.
- दि. २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी सादर केलेल्या पुरवणी मागणी रक्कम **रु. ११ हजार ९९५ कोटी ३३ लाख** इतकी आहे.
- सन २०२५-२६ साठी जुलै-डिसेबर, २०२५ व मार्च, २०२६ रोजी सादर झालेल्या एकूण पुरवणी मागण्यांची **रक्कम रु. १ लाख ४४ हजार ७९१ कोटी ४० लाखांवर** पोहोचली आहे.
- मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत **५ ते १० टक्क्यांपेक्षा अधिक रकमेच्या** पुरवणी मागण्या करू नये, अशा गोडबोले समितीने शिफारशी सुचविलेल्या होत्या. मात्र असे असताना सन २०२५-२६च्या मूळ अर्थसंकल्पात **एकूण पुरवणी मागण्यांचे प्रमाण १९.११%** इतके मोठे झाले आहे.
- सन २०२५-२६चा मूळ अर्थसंकल्प (**रु. ७ लाख ५७ हजार ५७५ कोटी ९५ लाख**) व एकूण पुरवणी मागणी **(रु. १ लाख ४४ हजार ७९१ कोटी ४० लाख) असून अर्थसंकल्पाची एकूण रक्कम रु. ९ लाख २ हजार ३६७ कोटी ३५ लाखांवर पोहोचली आहे.**
- एकूण अर्थसकंल्पाच्या तुलनेत मूळ अर्थसंकल्पाचे प्रमाण ८३.९५% इतके आहे, तर पुरवणी मागण्यांचे प्रमाण १६.०५% इतके आहे.
- फेब्रुवारी, २०२६ मध्ये एकूण **२८** विभागांनी पुरवणी मागण्या केल्या असून त्यामध्ये **६२** मागण्यांचा समावेश असून **१९३** बाबींचा अंतर्भाव आहे.
- पुरवणी मागण्या केलेल्या **२८** विभागांपैकी सर्वात मोठ्या प्रमाणावर उद्योग, ऊर्जा, कामगार, खनिकर्म विभागाने रु ९ हजार ९०७ कोटी १४ लाखांच्या असून एकूण मागणीत या एकट्या विभागाचे प्रमाण ८२.५९% आहे.

*(**स्रोत:** खर्चाचे पूरक विवरणपत्र, जुलै, डिसेंबर,२०२५ व मार्च, २०२६ व अर्थसंकल्पीय अंदाज, २०२५)*

# अर्थसंकल्पीय अधिवेश फेब्रुवारी - २०२६ मध्ये सादर झाल्या
## रु. ११ हजार ९९५ कोटी ३३ लाखांच्या पुरवणी मागण्या
### भांडवली स्वरूपाच्या पुरवणी मागण्यांचे प्रमाण ५०.०५% टक्के

*तक्ता क्र. : १* *(रु. कोटीत)*


| मागण्यांचे स्वरूप | भारित | दत्तमत | एकूण | प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| महसुली | २४३.४३ | ५,७४८.१० | ५,९९१.५४ | ४९.९५ |
| भांडवली | ०.० | ६,००३.७९ | ६,००३.७९ | ५०.०५ |
| **एकूण** | **२४३.४३** | **११,७५१.८९** | **११,९९५.३३** | **१००.००** |

***(स्त्रोत:** खर्चाचे पूरक विवरणपत्र, फेब्रुवारी २०२६)*

- मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सन २०२५-२६ साठी रु. ११ हजार ९९५ कोटी ३३ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या असून, त्यामध्ये **महसुली स्वरूपाच्या रु. ५ हजार ९९१ कोटी ५४ लाखांच्या (४९.९५%) पुरवणी मागण्या असून ६ हजार ३ कोटी ७९ लाखांच्या (५०.०५%) भांडवली स्वरूपाच्या पुरवणी मागण्या आहेत.**
- तर **भारित स्वरूपाच्या रु. २४३ कोटी ४३ लाखांच्या (२. ०३%) पुरवणी मागण्या असून रु. ११ हजार ७५१ कोटी ८९ लाखांच्या (९७.९७%) दत्तमत स्वरूपाच्या आहे.**

## मूळ मागणीच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण पोहोचले १९.११ टक्क्यांवर
### अर्थसंकल्पीय नियमंचा होतोय सर्रास भंग

*आलेख क्र. १* *रु. कोटीत*




***(स्त्रोत:** खर्चाचे पूरक विवरण पत्र, जून- जुलै, डिसेंबर, फेब्रुवारी २०२६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज- भाग-२)*

# मार्च २०२६ चा मूळ अर्थसंकल्प व वर्षभरातील पुरवणी मागणी

*तक्ता क्र. : २* *(रु. कोटीत)*

| अ. क्र. | मागणी | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण (%) | मूळ मागणीशी पुरवणी मागणीचे प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| १ | मार्च,२०२५चा मूळ अर्थसंकल्प | ७,५७,५७५.९५ | ८३.९५ | १००.०० |
| २. | जून-जुलै, २०२५च्या पुरवणी मागण्या | ५७,५०९.७० | ६.३७ | ७.५९ |
| ३. | डिसेंबर, २०२५ च्या पुरवणी मागण्या | ७५,२८६.३७ | ८.३४ | ९.९३ |
| ४. | फेब्रुवारी, २०२६ च्या पुरवणी मागण्या | ११,९९५.३३ | १.३२ | १.५८ |
| | **एकूण पुरवणी मागणी (२ ते ४)** | **१,४४,७९१.४१** | **१६.०४** | **१९.११** |
| **एकूण मागणी (१ ते ४)** | | **९,०२,३६७.३५** | **१००.००** | **११९.११** |

*(**स्त्रोत:** खर्चाचे पूरक विवरण पत्र, जून- जुलै, डिसेंबर, फेब्रुवारी २०२६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज, भाग-२)*

- **वर्ष २०२५-२६ मध्ये पावसाळी (जून-जुलै) अधिवेशनात पहिल्याच पुरवणी मागण्या रु. ५७ हजार ५०९ कोटी ७० लाख रुपयांच्या तर हिवाळी (डिसेंबर), अधिवेशन २०२५ मध्ये करण्यात आलेल्या पुरवणी मागणीची रक्कम रु. ७५ हजार २८६ कोटी ३७ लाख होती, तर फेब्रुवारी, २०२६ मध्ये सादर झालेल्या पुरवणी मागण्या रु. ११ हजार ९९५ कोटी ३३ लाखांच्या आहेत.**
- **तिन्ही पुरवणी मागण्या मिळून त्याची एकूण रक्कम रु. १ लाख ४४ हजार ७९१ कोटी ४० लाख एवढी झाली असून मूळ अर्थसंकल्पात तीचे प्रमाण १९.११ टक्के झाले आहे.**

## पुरवणी मागणी कधी करता येते ?

**नियम :**

- **अर्थसंकल्पीय अंदाज तयार करताना ज्याचा अंदाज करता आला नाही अशा कारणांमुळे खर्चासाठी नव्याने वा वाढीव तरतूद करावयाची झाल्यास किंवा**
- **अकल्पित व तातडीचा खर्च भागविण्यासाठी आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अगाऊ रकमेची भरपाई करावयाची झाल्यास शासनाने मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत ५ ते १० % पेक्षा अधिक रकमेच्या पुरवणी मागण करू नयेत असा दंडक आहे. या पुरवणी मागण्यांचे प्रमाण गोडबोले समितीने सुचविलेल्या शिफारशीनुसार विभागनिहाय ५ ते १० % दरम्यान ठेवावे अशी शिफारस आहे, मात्र आतापर्यंत कोणत्याच सरकारने पुरवणी मागण्याबाबतचा हा नियम पाळलेला नाही.**

**<u>वस्तुस्थिती :</u>**

**मूळ मागणीच्या (अर्थसंकल्प) रु. ७ लाख ५७ हजार ५७५ कोटी ९५ लाख इतकी होती, त्या तुलनेत सादर झालेल्या एकूण पुरवणी मागण्यांची रक्कम रु. १ लाख ४४ हजार ७९१ कोटी एवढी झाली असून या अर्थसंकल्पात त्याचे प्रमाण १९.११ % इतके मोठे आहे.**

## पुरवणी मागण्यांवरील चर्चेसंदर्भात अंदाज समितीचे मत!

**"फेब्रुवारी, २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केवळ २ दिवस चर्चेसाठी दिला असून, २८ विभागांपैकी फक्त ६ विभागांवर चर्चा होणार आहे. सर्व काम सुरळीत चालल्यास चर्चेसाठी ६ तास उपलब्ध होतात. त्यामध्येच खात्याच्या मंत्र्यांच्या उत्तराची वेळ समाविष्ट असते, म्हणजे साधारणत: एकूण २८८ सदस्यांपैकी मंत्रीगण व अध्यक्ष वगळून उरलेल्या सदस्यांना दोन दिवसांत १२ तास उपलब्ध असतात व ही वेळ बऱ्याचदा सदस्यांना अपुरी पडते. त्यामुळे बहुतेकदा चर्चा न करता विधानमंडळांकडून पूरक मागण्या मंजूर केल्या जातात ही वस्तुस्थिती आहे."**

**"बहुतांश पुरवणी मागण्या या खर्चाला औपचारिक मंजुरी मिळविण्यासाठी केलेल्या असतात. याचा अर्थ अर्थसंकल्पाला मंजुरी देताना विधिमंडळ ज्या खर्चांना मान्यता देते त्यासाठी रक्कम उपलब्ध न होता राजकीय हितासाठी केलेल्या पुरवणी मागण्यांसाठी निधी उपलब्ध करुन दिला जातो. असे असेल तर नियोजन, अर्थसंकल्प मंजुरी प्रक्रिया या औपचारिकता ठरतात. विधिमंडळाच्या 'अर्थसंकल्प मंजूर करण्याच्या अधिकारा' चा तो संकोच आहे. चर्चेशिवाय संमत होणाऱ्या पुरवणी मागण्या ही एक शासनाच्या अर्थसंकल्पातील गंभीर बाब असून त्यावर विरोधी पक्षाचे नियंत्रण असणे गरजेचे आहे. कारण याच कारणाने पुरवणी मागण्यांबाबतचा गैरव्यवहार वाढत चालला आहे. म्हणून पुरवणी मागण्यांवर चर्चा होण्याकरिता काहीना काही तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे."**

## फेब्रुवारी, २०२५ च्या पुरवणी मागण्यांमध्ये एकट्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ९ हजार ९०७ कोटी १४ लाख रुपयांच्या विक्रमी पुरवणी मागण्या!

*तक्ता क्र. : ३* *(रु. कोटीत)*

| सर्वात जास्त मागणी केलेला विभाग | रक्कम | पुरवणी मागणीशी प्रमाण (%) |
|---|---|---|
| उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग | ९,९०७.१४ | ८२.५९ |
| इतर २७ विभाग | २,०८८.१९ | १७.४१ |
| **एकूण पुरवणी मागणी** | **११,९९५.३३** | **१००.००** |

***(स्रोत:** खर्चाचे पूरक विवरणपत्र, फेब्रुवारी, २०२६)*

- **फेब्रुवारी २०२६ च्या पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २८ विभागांच्या समावेश असून त्यापैकी सर्वात जास्त ९ हजार ९०७ कोटी १४ लाखांच्या पुरवणी मागणी एकट्या उद्योग, ऊर्जा, कामगार व खानिकर्म विभागाने केल्या असून पुरवणी मागणींत त्याचे प्रमाण ८२.५९% इतके मोठे आहे.**
- **तर उर्वरित २७ विभागांनी रु २ हजार ८८ कोटी १९ लाखांच्या पुरवणी मागण्या केल्या असून त्यांचे प्रमाण पुरवणी मागणी मध्ये केवळ १७.४१% इतके आहे.**
- **यावरुन असे दिसते की, केवळ उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागासाठी मोठ्या प्रमाणावर या अधिवेशानात पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या आहेत.**

# रु.१० हजार ४२८ कोटी ७६ लाखांच्या मागण्या विना चर्चा मंजूर होणार !

## केवळ २ दिवसात रु. १ हजार ५६६ कोटी ५७ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा !

*तक्ता क्र. : ४* *(रु. कोटीत)*

| चर्चा होणारे विभाग | मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी रक्कम | मूळ मागणी रक्कम | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी प्रमाण (%) |
|---|---|---|---|---|
| **२६ फेब्रुवारी, २०२६** | | | | |
| अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग | ०१ | ५५.५२ | १३,८१०.६७ | ०.४० |
| नियोजन विभाग | ०२ | ८०.०० | ३४,९००.६१ | ०.२२ |
| सार्वजनिक आरोग्य विभाग | ०१ | ०० | १७,७७६.९९ | ०० |
| **२७ फेब्रुवारी,२०२६** | | | | |
| शालेय शिक्षण व क्रीडा विभाग | ०१ | ०० | ८६,२२०.३१ | ०० |
| पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग | ०२ | १,४३१.०५ | ५,९०३.४६ | २४.२४ |
| दिव्यांग कल्याण विभाग | ०१ | ०० | १,५८७.७१ | ०० |
| **चर्चेने मंजूर होणाऱ्या मागण्या** | **०८** | **१,५६६.५७** | **१,६०,१९९.७५** | **०.९७** |
| **विना चर्चा मंजूर होणाऱ्या मागण्या** | **५४** | **१०,४२८.७६** | **-** | **-** |
| **एकूण** | **६२** | **११,९९५.३३** | **७,५७,५७५.९५** | **१.५८** |

*(**स्त्रोत:** खर्चाचे पूरक विवरण पत्र, फेब्रुवारी.२०२६ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज, भाग- २)*

***टीप :-** चर्चेसाठी असलेले, परंतु केवळ हजारांच्या रकमेत असलेल्या पुरवणी मागणी केलेले विभाग १) सार्वजनिक आरोग्य, २) शालेय शिक्षण व क्रीडा, ३) दिव्यांग कल्याण विभाग.*

- **दि. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी १) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग २) नियोजन विभाग ३) सार्वजनिक आरोग्य विभाग तर दि. २७ फेब्रवारी २०२६ रोजी १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, २) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग व ३) दिव्यांग कल्याण विभागांच्या रु. १ हजार ५६६ कोटी ५७ लाखांच्या (१३.०५%) ८ मागण्यांवर चर्चा होणार आहेत. तर उर्वरीत २२ विभागांच्या रु. १० हजार ४२८ कोटी ७६ लाखांच्या (८६.५%) ५४ मागण्या विना चर्चा मंजूर होतील.**
- **सार्वजनिक आरोग्य, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिव्यांग कल्याण विभाग यांची पुरवणी मागणी हजारांतही नाही, मात्र हे विभाग चर्चेसाठी ठेवले आहेत.**
- **सर्वात जास्त पुरवणी मागणी करणारा उद्योग ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग चर्चेला नाही.**

## अ ) महायुती सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या: (ऑगस्ट २०२२-२३ ते २०२५-२६)

*तक्ता क्र. : ५* *(रु. कोटीत)*

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०२२-२३ | ५,४८,४०७.५२ | (ऑगस्ट, २०२२) २५,८२६.७१ | ४.७१ |
| | | (डिसेंबर, २०२२) ५२,३२७.८२ | ९.५४ |
| | | (फेब्रुवारी, २,४४,०२३) ६,३८३.९७ | १.१६ |
| | **एकूण** | **८४,५३८.५०** | **१५.४२** |
| २०२३-२४ | ६,०२,००८.२९ | (जुलै-ऑगस्ट, २०२३) ४१,२४३.२० | ६.८६ |
| | | (डिसेंबर, २०२३) ५५,५२०.७६ | ९.२२ |
| | | (फेब्रुवारी-मार्च, २०२४) ८,६०९.१७ | १.४३ |
| | **एकूण** | **१,०५,३७३.१४** | **१७.५** |
| २०२४-२५ | ६,६९,४९०.६८ | (जुन-जुलै, २०२४) ९४८८९.०६ | १४.१७ |
| | | (डिसेंबर, २०२४) ३५,७८८.४१ | ५.३५ |
| | | (मार्च, २०२५) ६,४८६.२० | ०.९७ |
| | **एकूण** | **१,३७,१६३.४६** | **२०.४९** |
| २०२५-२६ | ७,५७,५७५.९५ | (जून - जुलै, २०२५) ५७,५०९.७० | **७.४९** |
| | | (डिसेंबर, २०२५) ७५,२८६.३७ | **९.९३** |
| | | (फेब्रुवारी, २०२६) ११,९९५.३३ | **१.५८** |
| | **एकूण** | **१,४४,७९१.४१** | **१९.११** |

*(**स्त्रोत:** वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पूरक विवरणपत्र {वर्ष २०२२-२३ ते २०२५-२६})*

- **सन २०२२-२३ मध्ये मूळ अर्थ संकल्पात (५,४८,४०७.५२) एकूण पुरवणी मागण्याचे (८४,५३८.५०) प्रमाण १५.४२% इतके होते.**
- **सन २०२३-२४ मध्ये मूळ अर्थ संकल्पात (६,०२,००८.२९) एकूण पुरवणी मागण्याचे (१,०५,३७३.१४) प्रमाण १७.५% इतके होते.**
- **सन २०२४-२५ मध्ये मूळ अर्थ संकल्पात (६,६९,४९०.६८) एकूण पुरवणी मागण्याचे (१,३७,१६३.४६) प्रमाण २०.४९% इतके होते.**
- **सन २०२५-२६ मध्ये मूळ अर्थ संकल्पात (७,५७,५७५.९५) एकूण पुरवणी मागण्याचे (१,४४,७९१.४१) प्रमाण १९.११% इतके होते.**

## ब) महाविकास आघाडी सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या:
### (डिसेंबर २०१९-२० ते मार्च २०२२-२३)

तक्ता क्र. : ६ (रु. कोटीत)

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०१९-२० | ४,०४,७९४.१९ | (डिसेंबर २०१९ व मार्च २०२०) ४०,८४४.०७ | १०.०९ |
| २०२०-२१ | ४,३४,०८४.७८ | ७२,१५२.०० | १७.३१ |
| २०२१-२२ | ४,८४,०९०.६७ | ६०,६९८.२८ | १२.५३ |
| **एकूण** | **१३,२२,९६९.६४** | **१,७३,६९४.३५** | **१३.१२** |

*स्त्रोत : वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पूरक विवरणपत्र वर्ष २०१९-२० (डिसेंबर २०१९ व मार्च २०२०) ते २०२१-२२*

- **महाविकास आघाडी सरकारच्या काळात सन २०१९-२० मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ४ लाख ४ हजार ७९४ कोटी १९ लाखांचा होता, त्या तुलनेत ४० हजार ८४४ कोटी ७ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्याचे प्रमाण १०.०९ टक्के इतके राहिले आहे.**
- **महाविकास आघाडी सरकारच्या काळात वर्ष २०२०-२१ मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ४ लाख ३४ हजार ८४ कोटी ७८ लाखांचा होता, त्या तुलनेत रु. ७२ हजार १५२ कोटींच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या, मूळ अर्थसंकल्पातच्या तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण १७.३१ टक्के इतके होते.**
- **वर्ष २०२१-२२ मध्ये मूळ अर्थसंकल्प रु. ४ लाख ८४ हजार ९० कोटी ६७ लाखांचा होता, त्या तुलनेत रु. ६० हजार ६९८ कोटी २८ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण १२.५३ टक्के इतके मोठे राहिले होते.**
- **वर्ष २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षाच्या कालावधीत मूळ अर्थसंकल्पांची एकूण रक्कम रु. १३ लाख २२ हजार ९६९ कोटी ६४ लाख होती, त्या तुलनेत रु. १ लाख ७३ हजार ६९४ कोटी ३५ लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या असून त्याचे मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत पुरवणी मागणीचे प्रमाण १३.१३ टक्के इतके राहिले होते.**

## क) युती (फडणवीस) सरकारच्या काळातील पुरवणी मागण्या:
## (डिसेंबर २०१४-१५ ते डिसेंबर, २०१८-१९)

तक्ता : ७ (रु. कोटीत)

| वर्ष | मूळ अर्थसंकल्प | एकूण पुरवणी मागणी | प्रमाण |
|---|---|---|---|
| २०१४-१५ | २,१३,४६२.३१ | (डिसेंबर-मार्च) ११,७३८.८१ | ५.४९ |
| २०१५-१६ | २,४३,०२६.०९ | ३५,४६८.५२ | १४.५९ |
| २०१६-१७ | २,७०,७६३.९३ | ३३,६२६.३० | १२.४२ |
| २०१७-१८ | ३,००,३९७.६६ | ६३,८०७.४६ | २१.२४ |
| २०१८-१९ | ३,६७,२८०,८७ | (जुलै-डिसेंबर) ३१,७८२.२८ | ८.६५ |
| **एकूण** | **१३,९४,९३०.८६** | **१,७६,४१३.३७** | **१२.६५** |

*(**स्त्रोत:** वित्त विषयक विवरण पत्र, खर्चाचे पुरक विवरणपत्र वर्ष २०१४-१५ ते २०१८-१९)*

**टीप:** वर्ष २०१४-१५ मधील जुलै २०१५च्या पुरवणी मागण्यांचा समावेश नाही. तसेच मार्च, २०१९ मधील पुरवणी मागण्या येणे बाकी असल्याने वर्ष २०१४-१५ व २०१८-१९ मधील पुरवणी मागण्यांचे प्रमाण कमी दिसते.

- **वर्ष २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पात पुरवणी मागण्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ६३,८०७.४६ (२१.२४%) राहिले आहे.**
- **मागील ५ वर्षातील अर्थसंकल्पाच्या (१३,९४,९३०.८६ कोटी) तुलनेत पुरवणी मागण्यांचे प्रमाण सरासरी १२.६५% आहे.**
- **एकाही वर्षी या फडणवीस सरकारला पुरवणी मागण्यांचे प्रमाण ५% ते १०% दरम्यान ठेवता आलेले नाही.**

*****